दिनांक ०९/०४/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आलोसे १) बबन आनंदा हलगडे, ग्रामसेवक जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद व २) खाजगी इसम- गणेश उत्तमराव शेलार, रा. जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रु लाचेची मागणी केल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे कारवाई.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे व आरोपी यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | **१) बबन आनंदा हलगडे वय ५३ वर्षे , ग्रामसेवक जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**<br>**२) खाजगी इसम- गणेश उत्तमराव शेलार वय ४२ वर्षे, रा. जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद** |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे दौलताबाद, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | ३०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | **तक्रारदार यांचे मौजे जंभाळा हद्दीत गट क्रमांक ७९ मधे शेत आहे त्या शेतीमधे कृषी विभागाकडून मंजुर झालेल्या विहिरीसाठी ग्रामपंचायत ठराव व कुटुंब प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रु लाचेची मागणी** |

१) **तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे मौजे जंभाळा शिवार हद्दीत गट क्रमांक ७९ मधे शेत आहे. सदर शेती मध्ये कृषी विभागाकडून मंजुर झालेल्या विहिरीसाठी ग्रामपंचायत ठराव व कुटुंब प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे बबन हलगडे, ग्रामसेवक जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद हे व खाजगी ईसम गणेश शेलार, रा. जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद हे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता बबन आनंदा हलगडे , ग्रामसेवक जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद व २) खाजगी इसम- गणेश उत्तमराव शेलार, रा. जंभाळा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. या वरुन वर नमुद दोन्ही आरोपी यांचेविरुद्ध पोलीस ठाणे दौलताबाद औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, यांनी केली आहे. त्यांना याकामी पोलीस अंमलदार- राजेंद्र सिनकर, सुनिल पाटील, संतोष जोशी, चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

०९/०४/२०२१

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**